ISBN - 978-81-19118-36-6
27 July 2023


४. डिजिटल युगातील ग्रंथालय संसाधनांसाठी संकलन विकास धोरण ........................................२६९
- सौ. दीपाली आर. जाधव, डॉ. सुभाष पी. चव्हाण,
- डॉ. नंदकुमार बी. दहिभाते

५. डिजिटल लायब्ररी-इंजिनिअरिंगचे एक मुख्य साधन .........२७५
- डॉ. शिवशंकर के. घुमरे, श्री. अतुल रामदास नगरकर

६. शोधगंगा या ऑनलाइन पीएच. डी. डेटाबेसवर शोधप्रबंध अपलोडिंगमध्ये डॉ. धर्मराज वीर यांचे योगदान ..२८३
- राहुल इंगळे, डॉ. गोवर्धन औटे

७. आधुनिक युगातील ग्रंथालय व वाचनसंस्कृती काळाची गरज ........................................२८९
- अर्चना तात्याराव येळीकर

८. वाचनसंस्कृती विकासात ग्रंथालयाचे योगदान ................२९६
- श्री. राजाराम वामन कापडी, श्री. योगेश प्रकाश सुरवाडे,
- श्री. संतोष सुभाष लोखंडे

९. ग्रंथालयाची प्रतिष्ठा बदलण्यासाठी ग्रंथपालांमधील सामर्थ्य ३०३
- डॉ. राहुल कल्याणराव देशमुख, प्रा. गुरूदेव गांगुर्डे

१०. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० आणि ग्रंथालय शिक्षण ......३१२
- डॉ. सौ. एस. पी. बिदरकर, श्री. प्रमोद उत्तमराव बावस्कर

११. मोफत ग्रंथालय आज्ञावलीचे प्रभावी उपयोजन ..............३१६
- राहुल इंगळे, कविता नारायण तुपे

१२. मराठी भाषिक संदर्भग्रंथ, ग्रंथालयातील संदर्भग्रंथाचे मूल्यमापन : एक अभ्यास ......................३२२
- रमेश पिंपळे, डॉ. संजय भेदेकर

१३. मॅन वर्सेस मशीन (ChatGPT) ............................३२८
- अनिता देशपांडे

१४. वाचनसंस्कृती : बेस्ट प्रॅक्टिसेस ............................३३२
- डॉ. ह. सो. बिडवे

१५. सध्याच्या काळातील ग्रंथालयांची होत असलेली उपेक्षा आणि समाजाकडून हव्या असलेल्या अपेक्षा..........३३६
- सौ. मनीषा राजन कडव

१६. ग्रंथालय आणि वाचनसंस्कृती ...............................३३९
- रेखा गजानन जोशी

१७. ग्रंथसंग्रह पडताळणी करण्याअगोदर उपाययोजना ............३५२
- डॉ. विजया भा. सूर्यवंशी

# मराठी भाषिक संदर्भग्रंथ, ग्रंथालयातील संदर्भग्रंथाचे मूल्यमापन : एक अभ्यास

– रमेश पिंपळे,
संशोधक विद्यार्थी, ग्रंथालयशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
– डॉ. संजय पेदेकर,
संशोधन मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक,
जे. बी. एस. पी. एम. महिला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड.

**गोषवारा** (Abstract)

ग्रंथालय ही सेवा पुरविणारी संस्था आहे. ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचे भांडार होय. ग्रंथालयाला ज्ञानाचे भांडार म्हणण्याचे कारण आपल्या ग्रंथालयामध्ये हवी ती माहिती एकाच ठिकाणी मिळते. तेव्हाच ग्रंथालयाचे 'ग्रंथालय' नाव सार्थ होते. वाचकांचे विविध प्रकारचे प्रश्न सोडविण्यासाठी 'संदर्भग्रंथ' खूप उपयुक्त ठरतात, अशा मौलिक साधनास 'संदर्भ साधने' म्हणून संबोधतात.

**प्रस्तावना** (Introduction)

ग्रंथालयामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे वाचन साहित्य उपलब्ध असते, जसे- वेगवेगळे ग्रंथ, नियतकालिके, वार्षिके, क्रमिक पुस्तके, तसेच संदर्भग्रंथ होय. प्रत्येक ग्रंथालयात वाचकांच्या विविध माहितीसाठी विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे देण्यासाठी संदर्भग्रंथांची आवश्यकता असते. पुस्तक विक्रेत्यांकडे अनेक प्रकारचे संदर्भग्रंथ उपलब्ध असतात; परंतु संदर्भग्रंथ अतिशय महाग असल्यामुळे ते सर्व विकत घेणे परवडत नाही. त्यामुळे ग्रंथालयाच्या वार्षिक अंदाजपत्रकात जशी तरतूद असेल, तसे वाचकांच्या बहुतेक प्रश्नांना उत्तरे देता येतील, असे निवडक संदर्भग्रंथ ग्रंथालयात घेतले जातात. त्यासाठी अनेक संदर्भ ग्रंथातून निवडक ग्रंथ घेण्याच्या दृष्टीने काही निकष ठरवावे लागतात. संदर्भग्रंथातून विविध विषयांशी संबंधित माहितीचे सखोल ज्ञान मिळते.

**संदर्भग्रंथ व त्यांचे स्वरूप**

संदर्भग्रंथ व सामान्य पुस्तके यामध्ये बराच फरक आहे, ते असे -

१. सामान्य पुस्तके प्रारंभापासून वाचली जातात; परंतु संदर्भग्रंथ तसा वाचला जात नाही. केवळ एखाद्या माहितीसाठी तो अवलोकन केला जातो.
२. संदर्भग्रंथ विषयवार सामान्य पुस्तकांबरोबर सुरुवातीस कपाटात

ठेवतात किंवा संदर्भग्रंथ विषयवार वेगळ्या क्रमाने ठेवतात.

३. साधी पुस्तके शक्यतो एकाच खंडात असतात, तर संदर्भग्रंथ अनेक खंडात असतात. उदा. 'कादंबरी' हे सामान्य पुस्तक आहे व 'मराठी विश्वकोश' हा संदर्भग्रंथ अनेक खंडांत आहे.

४. सामान्य पुस्तके घरी वाचण्यास दिली जातात; परंतु 'संदर्भग्रंथ' घरी दिला जात नाही.

५. सामान्य पुस्तकातील मजकूर एकाच विषयावर लिहिलेला असतो व त्याची मांडणी प्रकरणानुसार केलेली असते. संदर्भग्रंथाची आंतर-रचना वर्णानुसार किंवा विषयानुसार करतात. इतिहासविषयक संदर्भग्रंथात काळानुसार रचना करतात.

६. संदर्भग्रंथाच्या तुलनेत सामान्य पुस्तकांची किंमत फार कमी असते.

स्थूलपणे असे म्हणता येईल की, संदर्भग्रंथ हे विश्वकोश, शब्दकोश, सूची, वार्षिके, मार्गदर्शिका, चरित्रात्मक साधने, भौगोलिक साधने, सांख्यिकीय माहिती साधने इत्यादी प्रकारात विभागलेले असतात. ही साधने मुद्रित किंवा अंकित स्वरूपात असू शकतात. विश्वकोश आणि शब्दकोश हे ज्ञानसंग्रह करणे आणि अध्ययन- अध्यापन पद्धतीतील महत्त्वाची साधने असतात. जगातील सर्वच भाषांमध्ये ही साधने प्रकाशित होत असतात. विविध ज्ञानशाखा जसजशा विकसित होतात, तसतशा आंतरशाखादेखील उदयास येत असतात. म्हणून प्रादेशिक भाषेतून संदर्भ साधनांची निर्मिती होणे आवश्यक असते.

मराठी भाषेतून ज्ञाननिर्मिती झाली, तरच मराठीतून शिक्षण देता येऊ शकेल आणि मराठी भाषा स्वतंत्र प्रभेसह टिकेल, विस्तार पावेल. ज्ञानभाषा ही संकल्पना समजून घेऊन मराठी भाषा राज्यभाषा कशी होईल यासाठी तज्ज्ञ अभ्यासकांचे सहकार्य घ्यायला हवे. लोकभाषा ते ज्ञानभाषा अशा मराठीच्या प्रवासासाठी अर्थसहाय्य करणे आणि कायदे नियम व तरतुदी करणे अशा सर्व गोष्टी टप्प्याटप्प्याने करायला पाहिजे.

**संदर्भग्रंथ म्हणजे काय?**

**डॉ. करमटकर, प्रकाश (२०१२)** "जी पुस्तके पहिल्या पानापासून शेवटच्या पानांपर्यंत वाचण्याची आवश्यकता नसते, केवळ विशेष उद्देशाकरिता, उद्दिष्टांकरिता, माहितीकरिता वाचली जातात, अशा पुस्तकांना संदर्भग्रंथ म्हणतात."

**डॉ. मु. प्र. सातारकर, डॉ. उद्धव, रा. आघाव (२०१२)** "Book which are kept for reference only and are not allowed to carry outside the buililing of library. These are compiled supply definite pices

ठेवतात किंवा संदर्भग्रंथ विषयवार वेगळ्या क्रमाने ठेवतात.

३. साधी पुस्तके शक्यतो एकाच खंडात असतात, तर संदर्भग्रंथ अनेक खंडात असतात. उदा. 'कादंबरी' हे सामान्य पुस्तक आहे व 'मराठी विश्वकोश' हा संदर्भग्रंथ अनेक खंडांत आहे.

४. सामान्य पुस्तके घरी वाचण्यास दिली जातात; परंतु 'संदर्भग्रंथ' घरी दिला जात नाही.

५. सामान्य पुस्तकातील मजकूर एकाच विषयावर लिहिलेला असतो व त्याची मांडणी प्रकरणानुसार केलेली असते. संदर्भग्रंथाची आंतर-रचना वर्णानुसार किंवा विषयानुसार करतात. इतिहासविषयक संदर्भग्रंथात काळानुसार रचना करतात.

६. संदर्भग्रंथाच्या तुलनेत सामान्य पुस्तकांची किंमत फार कमी असते.

स्थूलपणे असे म्हणता येईल की, संदर्भग्रंथ हे विश्वकोश, शब्दकोश, सूची, वार्षिक, मार्गदर्शिका, चरित्रात्मक साधने, भौगोलिक साधने, सांख्यिकीय माहिती साधने इत्यादी प्रकारात विभागलेले असतात. ही साधने मुद्रित किंवा अंकित स्वरूपात असू शकतात. विश्वकोश आणि शब्दकोश हे ज्ञानसंग्रह करणे आणि अध्ययन- अध्यापन पद्धतीतील महत्त्वाची साधने असतात. जगातील सर्वच भाषांमध्ये ही साधने प्रकाशित होत असतात. विविध ज्ञानशाखा जसजशा विकसित होतात, तसतशा आंतरशाखादेखील उदयास येत असतात. म्हणून प्रादेशिक भाषेतून संदर्भ साधनांची निर्मिती होणे आवश्यक असते.

मराठी भाषेतून ज्ञाननिर्मिती झाली, तरच मराठीतून शिक्षण देता येऊ शकेल आणि मराठी भाषा स्वतंत्र प्रभेसह टिकेल, विस्तार पावेल. ज्ञानभाषा ही संकल्पना समजून घेऊन मराठी भाषा राज्यभाषा कशी होईल यासाठी तज्ज्ञ अभ्यासकांचे सहकार्य घ्यायला हवे. लोकभाषा ते ज्ञानभाषा अशा मराठीच्या प्रवासासाठी अर्थसहाय्य करणे आणि कायदे नियम व तरतुदी करणे अशा सर्व गोष्टी टप्प्याटप्प्याने करायला पाहिजे.

**संदर्भग्रंथ म्हणजे काय?**

**डॉ. करमटकर, प्रकाश (२०१२)** "जी पुस्तके पहिल्या पानापासून शेवटच्या पानांपर्यंत वाचण्याची आवश्यकता नसते, केवळ विशेष उद्देशाकरिता, उद्दिष्टांकरिता, माहितीकरिता वाचली जातात, अशा पुस्तकांना संदर्भग्रंथ म्हणतात."

**डॉ. सु. प्र. सातारकर, डॉ. उद्धव, रा. आघाव (२०१२)** "Book which are kept for reference only and are not allowed to carry outside the builiing of library. These are compiled supply definite pices

of information varying extent and intended to be reffered to rather than read thoroughly e.g. Encyclopedia, Dictionary Year books etc."

याचे विशेषतः म्हणजे संदर्भग्रंथांचे संकलन त्या ग्रंथातील प्रतिपादन, आवश्यकतेप्रमाणे त्याचे व्यवस्थापन असे काही अंश लेखकांपासून ठेवून केलेले असते. त्यामुळे संदर्भग्रंथाच्या बाबतीत सर्वसामान्यपणे आपण संदर्भकर्त्यांना लेखक असे म्हणत नाही, तर त्यास संपादक हा शब्द वापरतो. इतर ग्रंथांच्या बाबतीत प्रतिभेला आविष्कार त्या त्या ग्रंथांच्या बाबतीत महत्त्वाचा भाग ठरू शकतो. संदर्भग्रंथाच्या बाबतीत प्रतिभा, आविष्कार हा भाग महत्त्वाचा ठरत नाही, तर त्या ग्रंथातील माहितीची उपयुक्तता आणि त्याअनुषंगाने केलेली मांडणी महत्त्वाची ठरते.

**संदर्भग्रंथाचे उद्देश**

**मराठे ना. बा. (मार्च १९७३)** ''संदर्भग्रंथाचे दुसरे महत्त्वाचे गमक म्हणजे त्या उद्देशानुसार त्याची व्याप्ती आहे की नाही, उद्देश म्हणजे प्रतिपाद्य विषय आणि त्याची व्याप्ती होय.''

**संदर्भग्रंथाचे मूल्यमापन**

संदर्भग्रंथात दिलेली माहिती विश्वसनीय व अधिकृत असणे आवश्यक असते. चुकीची माहिती हानिकारक असते. त्यामुळे ग्रंथ निवडताना हे मुद्दे लक्षात ठेवावे लागतात व खात्री करूनच पुढील मुद्यांचा विचार करावा लागतो.

अ) प्रकाशन संस्थेचा दर्जा, तिला लाभलेली मान्यता व तिचा कार्यानुभव.

आ) संपादक मंडळातील सदस्यांचा अनुभव व त्यांची शैक्षणिक पात्रता.

इ) संदर्भग्रंथातील लेखांचा व लेखकांचा दर्जा व गुणवत्ता, तसेच लेखकांचा त्या क्षेत्रातील अनुभव.

**व्याप्ती**

संदर्भग्रंथातील माहितीची व्याप्ती किती आहे, हे तो ग्रंथ विकत घेताना लक्षात घ्यावे. ग्रंथात दिलेली प्रत्यक्ष माहिती व ग्रंथनाम यांची तपासणी करावी. तो ग्रंथ वाचकांच्या गरजा पूर्ण करू शकत असेल, तरच तो घेण्याचा विचार करावा, तसेच कोणत्या वाचकांसाठी संदर्भग्रंथ आहे याचाही विचार होणे अत्यावश्यक आहे.

**माहितीचे स्वरूप**

संदर्भग्रंथात दिलेली माहिती लिहिण्याची पद्धत तपासणे, हे फार महत्त्वाचे काम आहे. दिलेली माहिती सविस्तर व सर्वांना समजेल अशी असली पाहिजे, तसेच त्यात लिहिलेली माहिती सामान्यांसाठी की संशोधकांसाठी, याचाही

माहितीचे स्वरूप पाहताना विचार केला पाहिजे.

**रचना**

संदर्भग्रंथातील माहितीची रचना वाचकांना समजेल अशी सोप्या स्वरूपात असावी. कमी वेळात निर्देशाच्या मदतीने माहिती शोधता यावी.

**वैशिष्ट्ये**

इतर संदर्भग्रंथापेक्षा आपण तपासत असलेल्या ग्रंथाची काय वैशिष्ट्ये आहेत ते तपासून पाहावे. या वैशिष्ट्या अद्ययावतता, ग्रंथाची बांधणी, कागद, आकार चित्रे, नकाशे इ. बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

अशा सर्व प्रकारचा विचार करूनच संदर्भग्रंथ वाचकांसाठी विकत घ्यावा.

**संदर्भग्रंथाचे प्रकार**

**अ) शब्दकोश**

एखाद्या भाषेतील शब्दाचा अर्थ, त्यांचा उच्चार, व्युत्पत्ती, व्याकरण, वाक्यातील प्रयोग, उपसर्ग, प्रत्यय इ. माहिती शब्दकोशातून मिळते. काही शब्दकोश केवळ एका भाषेचेच असतात त्यात त्या भाषेच्या शब्दांची माहिती दिली जाते. उदा. मराठी शब्दकोश, इंग्रजी शब्दकोश, जर्मन शब्दकोश, हिंदी शब्दकोश इ. काही शब्दकोशांत एका भाषेतील शब्दांची माहिती इतर भाषांतून देतात, अशा शब्दकोशास 'द्विभाषिक शब्दकोश' म्हणतात.

शब्दकोश म्हणजे विविध भाषांतील शब्दांचा विशिष्ट पद्धतीने केलेला संग्रह, विशिष्ट भाषेतील शब्दाचा विशिष्ट पद्धतीने केलेला संग्रह.

शब्दकोशांचा उपयोग खालीलप्रमाणे –

१. शब्दांचा अर्थ व वाक्प्रचारांचा अर्थ शोधणे.
२. शब्दांचे शुद्धलेखन पाहणे.
३. शब्दांचा उच्चार पाहणे.
४. शब्दांची व्युत्पत्ती पाहणे.
५. शब्दांचे पर्यायी शब्द – समानार्थी, विरुद्धार्थी, शोधणे.
६. परकीय भाषेतील शब्द व उच्चार पाहणे.

**आ) चरित्रकोश**

चरित्रकोशात व्यक्तींची नावे, त्यांची जन्मतारीख व कार्य या गोष्टींची माहिती दिलेली असते. मृत व्यक्तींच्या मृत्यूची तारीखही दिलेली असते. चरित्र म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या कालखंडातील तिच्या जीवनातील घडामोडी, कार्य, कर्तृत्व, कौटुंबिक जीवन, तिला मिळालेला मानसन्मान या सर्व माहितीचा जीवनपटच होय. व्यक्तीच्या चरित्राविषयी माहिती चरित्रकोशाव्यतिरिक्त ज्ञानकोश, वार्षिक व गॅझेटिअर यांसारख्या संदर्भग्रंथातदेखील मिळू शकते.

### इ) ज्ञानकोश

ज्ञानकोशात ज्ञानविश्वातील सर्व प्रमुख ज्ञानशाखा आणि उपशाखा यांची सर्व माहिती एकत्रित करून मांडणी जाते. ज्ञानकोशात विविध विषयावरील माहितीपूर्ण लेख त्या-त्या विषयातील तज्ज्ञांकडून लिहवून घेतात.

ज्ञानकोशाचे दोन प्रकार आहेत -

१) संकीर्ण ज्ञानकोश

२) विशेष ज्ञानकोश

संकीर्ण ज्ञानकोशात सर्व ज्ञान शाखांची माहिती एकत्रित केलेली असते; परंतु विशेष ज्ञानकोश विविध ज्ञान शाखासाठी संकलित करतात.

### ई) नकाशांचे पुस्तक

जगातील विविध देशांचे नकाशे, त्यातील शहरे, नद्यांचा उगम व शेवट, पर्वतांची उंची, देशांच्या सीमा, हवामान ऋतू, नैसर्गिक उपलब्धता, तेलांच्या खाणी, खनिजे, शेती उत्पन्न इ. माहिती नकाशाद्वारे दाखविलेली असते. भूगोलाच्या पुस्तकात वर्णन केलेली ही माहिती नकाशाद्वारे मिळते.

अशाप्रकारे मराठी भाषिक संदर्भग्रंथ व ग्रंथालयातील संदर्भग्रंथाचे मूल्मापन आवश्यक ठरते.

### निष्कर्ष

ज्ञान वेगवेगळ्या प्रकारच्या ग्रंथांमध्ये सामावलेले असते. अशी पुस्तके एकत्र करण्यास ग्रंथालये नेहमीच तत्पर असतात. संदर्भग्रंथांचा उपयोग वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळे वाचक करीत असतात. ज्ञानकोश, चरित्रकोश, शब्दकोश, वार्षिक, स्थलकोश इ. संदर्भग्रंथ ग्रंथालयामध्ये वाचकांसाठी उपलब्ध असतात. त्यामुळे संदर्भग्रंथांचा त्यांच्या व्याप्तीनुसार, उद्देशानुसार कार्यप्रणालीनुसार वापर वाचक करत असतात. तसेच अनेकविध वेगवेगळ्या अभ्यासाच्या दृष्टीने अभ्यासकाला संदर्भग्रंथ हाताळावे लागतात.

### संदर्भ


१. प्रा. बिरादार, वसंत (१ जानेवारी १९९७) : भाषा विज्ञान व्याकरण आणि निबंधलेखन, प्रथम आवृत्ती, श्री. आर. के. शेळके मराठवाडा पब्लिकेशन हाऊस, नागेशबाग, औरंगाबाद, पृ. ०७

२. श्री. लेले. आर. के. (१९७३) : ग्रंथवर्णन आणि ग्रंथसूची, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे -३० पृ.२

३. किता, पृ. ०३

४. जाखडे, अरुण (२०१३) : भारतीय भाषांचे लोक सर्वेक्षण महाराष्ट्र संपादक, पद्मगंगा प्रकाशन, पुणे.